# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/39/2026**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक १०/०७/२०२६**

**''वेश्या व्यवसायातुन ०२ बांगलादेशी महिलांसह ०६ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) व श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरातील अनैतिक व्यापार व अवैध व्यवसाय यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गजानन कदम यांना दिनांक ०८/०७/२०२६ रोजी माहिती मिळाली की, ''हॉटेल राहुल पार्क, फॅमिली रेस्ट्रो गार्डन बार, लॉजिग ॲण्ड बोर्डीग'' येथील मॅनेजर लॉजमध्ये महिला ठेवुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करून घेतो. मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास सदर हॉटेल येथे पाठवुन त्याचे सांकेतीक इशा-यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. छाप्यामध्ये ०२ बांगलादेशी महिलांसहीत एकुण ०६ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर गामा नंदु सोनकर, कॅशियर दिपु उमेश यादव, वेटर प्रियांशु रविदास यादव यांनी पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवुन मॅनेजर गामा सोनकर याने त्यांना बनावट ग्रहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन २५००/- रूपये कॅशियर दिपु यादव याने बनावट ग्राहकाकडुन स्वीकारले. नमुद लॉज वेश्याव्यवसायाकरीता वापरला म्हणुन आरोपी १) गामा नंदु सोनकर (लॉज मॅनेजर), २) दिपु उमेश यादव (कॅशियर), ३) प्रियांशु रविदास यादव (वेटर) व पाहिजे आरोपी ४) रमेश शर्मा (लॉज मालक) **यांच्या विरूध्द पनवेल शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ४५५/२०२६, भा.न्या.सं. कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील तिन्ही आरोपींना दिनांक ०९/०७/२०२६ रोजी अटक करण्यात आली असुन त्यांची दिनांक १३/०७/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाणे करीत आहे.**

सदरची उल्लेखनिय कामगिरी सहायक पोलीस आयुक्त, श्री.शैलेशकुमार अंचलवार, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/गजानन कदम, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/२५०४ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, पोना/२९८४ अनिता भोये, चालक पोहवा/४८०६ मोहिते, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२३९ पारासुर व पोशि/४५४४ पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई